# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES
म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४
Mhasrul, Dindori Road, Nashik – 422 004.
**Phone:** 0253-2539175 / **EPABX:** 0253-2539100 - 300 / **Fax:** 0253-2539176
**E-mail:** pro@muhsnashik.com / **Web:** www.muhsnashik.com


क्र. मआविवि/पीआर/५१९/२०११

दि. ३० मे २०११

<u>वृत्त प्रसिध्दीसाठी</u>

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ. अरुण जामकर यांना AMASI आंतरराष्ट्रीय संस्थेची फेलोशिप.

**नाशिक (दि.३०)** - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ. अरुण जामकर यांना सिंगापूर येथे नुकतीच आयोजित सहाव्या इंटरनॅशनल कॉंग्रेस ऑफ असोसिएशन ऑफ मिनिमल ॲक्सेस सर्जन्स ऑफ इंडिया (6th International Cogress of Association of Minimal Access Surgeons of India amasicon 2011 (AMASI) या आंतरराष्ट्रीय संस्थेची फेलोशिप प्रदान करण्यात आली आहे.

AMASI ही संस्था प्रामुख्याने अद्ययावत तंत्रज्ञानाची शस्त्रक्रियेतील उपयुक्तता याबाबत कार्यरत आहे. विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ.अरुण जामकर AMASI या संस्थेचे संस्थापक सदस्य आहे. ही संस्था गुंतागुंतीची शस्त्रक्रिया करतेवेळी घेण्यात येणारी दक्षता, उपलब्ध असणाऱ्या पुराव्यांनुसार शस्त्रक्रियेप्रसंगी योग्यरित्या व्यवस्थापन करणे विषयी कार्य करते. याकरीता या क्षेत्रातील प्रसिध्द आणि अनुभवी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन त्याप्रमाणे विविध आजारांच्या उपचाराकरीता कार्यवाही करणेविषयी नियोजन करणे या संस्थेचे प्रमुख ध्येय आहे.

या चर्चासत्रास प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ.अरुण जामकर उपस्थित होते. या चर्चासत्रामध्ये प्रामुख्याने डायग्नोस्टिक लेप्रोस्कोपिक (Diagnostic Laparoscopy), ॲपेंडिसेक्टोमी (Appendicectomy), कोलेसिस्टेक्टोमी (Cholecystectomy), सीबीडी एक्सप्लोरेशन (CBD Exploration), फन्डोप्लिकेशन (Fundoplication), हेलर्स कार्डिओमायोटोमी (Hellers Cardiomyotomy), टीईपी (TEP), टीएपीपी (TAPP), व्हेन्ट्रल हर्निया रिपेअर्स (Ventral Hernia Repair), स्लीव गॅस्ट्रेक्टॉमी (Sleeve Gastrectomy), एआर/एपीआर (AR/ APR), रेक्टोपेक्सी (Rectopexy), हायस्टेरेक्टॉमी (Hysterectomy) आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या चर्चासत्रामध्ये या क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित तज्ज्ञ सहभागी झाले होते.

कुलसचिव